स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या भूगोल विषयातील पीएच.डी
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

(Short Resume)

संशोधन विषय

"बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि शिरुर (का) तालुक्याच्या कृषी भूमी उपयोजनाचा तौलनिक अभ्यास"

(2001-2011)

"A Comparative Study of Agricultural land Use In Majalgaon And Shirur (ka) Tehsil of Beed District"

*** संशोधक ***

खटाणे राजेश पांडुरंग

(एम.ए.भूगोल.यू.जी.सी.नेट)

*** संशोधन मार्गदर्शक ***

डॉ.माळी.एन.जी.

विभाग प्रमुख,भूगोल

महात्मा बसवेश्वर महाविदयालय लातूर

मे 2019

प्रस्तावना (Introduction):-

ग्रामीण भागातील लोकांसाठी शेती हे उपजिविकेचे साधन आहे. कृषी क्षेत्रात झालेल्या अनेकविद्य संशोद्यन आणि तांत्रिक प्रगतीच्या साहाय्याने कृषी क्षेत्रात विकास होत असला तरीही ग्रामीण भागामध्ये मागासलेपण,अपु-या जलसिंचन सुविधा,दुष्काळ,पूर,गारपीट,मान्सूनची अनिश्चितता, पिकावरील रोगराई, शेतीचे लहान—लहान तुकडयामध्ये होणारी विभागणी रस्त्यांचा अभाव, शेतक-यांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव शेतीमालाला अयोग्य भाव यासारख्या अनेक समस्यामुळे शेती उत्पादनावर आणि पर्यायाने शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला दिसतो. बीड जिल्हायासह सबंध मराठवाडयात गेली अनेक वर्षापासुन सातत्त्याने मान्सूनची अनिश्चितता दिसून येत असल्याकारणाने येथील शेतीवर त्याचा परिणाम झालेला दिसून येतो.

कोणत्याही प्रदेशामध्ये कृषी भूमी वापर आणि पीक प्रारुप यावर तेथील भूरचना,जमिनीचा दर्जा, जलस्त्रोत,बाजारपेठ,रस्ते,हवामान या सारख्या घटकांचा प्रभाव पडतो. बीड जिल्हयातील माजलगाव आणि शिरुर (का) हे दोन तालुके भौगोलिकदृष्टया वेगळे आहेत या दोन तालुक्यातील भूरचना,मृदा,जलस्त्रोत हे घटक वेगळे असल्याकारणाने येथील कृषी भुमी वापर व पीक प्रारुप यामध्ये फरक दिसतो. माजलगाव आणि शिरुर (का) तालुक्यातील विभिन्न भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास तेथील कृषी विकास, कृषी विषयक पायाभूत सुविधा, दोन्ही तालुक्यातील कृषी भूमी वापर व पीक प्रारुपामध्ये असणारा बदल जाणुन घेण्याच्या दृष्टिने हे दोन तालुके संशोधनासाठी निवडलेले आहेत.

अभ्यासक्षेत्र (Study Aera):-

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या बीड जिल्हायातील माजलगाव व शिरुर (का) तालुक्याची निवड केली आहे. बीड जिल्हा मराठवाडयाच्या मध्यस्थानी आहे. बीड जिल्हयाचे भौगोलिक स्थान 18^0 28 उत्तर ते 19^0 27 उत्तर अक्षांश आणि 74^0 54 पूर्व ते 76^0 57 पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान असुन क्षेत्रफळ 10693 चौ.कि.मी आहे. बीड जिल्हयामध्ये एकूण अकरा तालुके आहेत. प्रशासकीय सोयीकरीता बीड व अंबाजोगाई असे दोन विभाग केले आहेत. बीड विभागात बीड,गेवराई,शिरुर (का),पाटोदा,आष्टी व वडवणी तर अंबाजोगाई विभागात अंबाजोगाई,धारुर,केज,परळी,व माजलगाव या तालुक्यांचा समावेश होतो.

माजलगाव तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 18^0 58 उत्तर ते 19^0 18 उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार 75^0 58 पूर्व ते 76^0 22 पूर्व रेखांश असून क्षेत्रफळ 1097 चौ.कि.मी आहे. या तालुक्याच्या पूर्वेस पाथरी (जि.परभणी), पाश्चिमेला गेवराई

तालुका, दक्षिणेस वडवणी व धारुर तालुका, उत्तरेस परतुर (जि जालना) व आग्नेयेला परळी तालुक्याच्या सीमा आहेत. माजलगाव तालूका गोदावरी, सिंदफणा,सरस्वती व कुंडलिका या नदयांच्या खो-यात पसरलेला आहे. तसेच शिरुर (का) तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार 18^0 28 उत्तर ने 18^0 55 उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार 75^0 5 पूर्व ते 75^0 55 पूर्व रेखांश असुन क्षेत्रफळ 392.65 चौ.कि.मी आहे. या तालुक्याला पूर्वेस बीड, पश्चिमेस अहमदनगर जिल्हयाची सीमा, दक्षिणेस पाटोदा तालुका व उत्तरेस गेवराई तालुका अशा सीमा आहेत. या तालुक्यात सिंदफणा, उथळा सिना या नदया आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे (Aim sand Objective):-

1) बीड जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
2) माजलगाव व शिरुर (का) तालुक्यातील कृषी विषयक पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.
3) माजलगाव व शिरुर (का) तालुक्यातील कृषी उत्पादनाचा अभ्यास करणे.
4) माजलगाव व शिरूर (का) तालुक्यातील पीक प्रारूपाचा अभ्यास करणे.
5) माजलगाव व शिरूर (का) तालुक्यातील लोकसंख्या वितरणाचा अभ्यास करणे.
6) माजलगाव व शिरूर (का) तालुक्यातील कृषी भूमी वापराचा तुलनात्मक अभ्यास करणे.

संशोधन पध्दती (Research Methodology):-

सदर संशोधनाकरिता उपलब्ध संशोधन साहित्य आणि सांख्यिकीय आकडेवारी प्राथमिक व द्वितीयक स्वरूपाची वापरण्यात येणार असुन यामध्ये प्राथमिक स्वरुपाची माहिती प्राप्त करण्यासाठी शेतक-यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जातील तर लिखित माहिती मिळविण्यासाठी स्वत: प्रश्नावली तयार करून ती संशोधन क्षेत्रातील शेतक-यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे पुर्ण केली जाईल त्याच बरोबर भौगोलिक निरिक्षण देखील केले जाईल. द्वितीय स्वरूपाची आकडेवारी आणि माहिती घेण्यासाठी जिल्हा कृषी कार्यालय, जिल्हा जनगणना, कृषी विभागाचे प्रसिध्द केलेले अहवाल, कृषी मासिके, जलसिंचन विभाग तालुका कृषी पर्यवेक्षक सहायक,कृषी संशोधन केंद्र, जिल्हा सांख्यिकी विभाग व भूमि अभिलेख कार्यालय या सबंधित कार्यालयामधून उपलब्ध सामग्रीचा उपयोग संशोधनाच्या मांडणीसाठी केला जाईल. तसेच प्राथमिक व द्वितीयक माहिती आणि आकडेवारीचा सांख्यिकीय तंत्रासाठी वापर करण्यात येईल.

संशोधन साहीत्याचा आढावा (Review of Literature):-

कृषी क्षेत्राशी संबंधित विषयावर इतर ठिकाणी झालेल्या संशोधनाचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे.

1) डॉ. कनसे एस. एच. यांनी बीड जिल्ह्यातील नगदीपिकांचा भौगोलिक अभ्यास या विषयावर मे 2015 मध्ये डॉ. बा आं म. विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत पीएच. डी केली आहे.
2) डॉ.सुर्यवंशी एम. व्ही. यांनी *changing pattern of agricultural land use in raigad district* या विषयावर डिसेंबर 2009 मध्ये डॉ. बा. आं. म. विद्यापीठ अंतर्गत पीएच.डी केली आहे.
3) डॉ. फोके डी. यु. यांनी *A Study of agricultural Land use in Akola district a geographical Study* या विषयावर 2008 मध्ये स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पीएच.डी. केली आहे.
4) डॉ. लांडगे एस.एस यांनी माजलगाव तालूक्यातील कृषी उत्पादनाचे भौगोलिक विश्लेषण या विषयावर जानेवारी 2014 मध्ये डॉ.बा.आं.म.विद्यापीठ अंतर्गत पीएच. डी. केली आहे.
5) डॉ. पोळ एन. एस. यांनी *Agricultural Land use and land degradation in sangli District a geographical analysis* या विषयावर 2012 मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत पीएच.डी केली आहे.
6) डॉ. गायकवाड जे.आर यांनी बीड तालूक्यातील कृषी उत्पादनाचा अभ्यास या विषयावर सप्टेंबर 2013 मध्ये डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत पीएच. डी केली आहे.

7) डॉ सोनवणे व्ही.के यांनी शिरूर (का) तालूक्यातील कृषी उत्पादन क्षमतेचे भौगोलिक सवैक्षण या विषयावर ऑक्टोबर 2011 मध्ये डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत पीएच.डी. केली आहे.
8) डॉ.कोरे. एन.एस यांनी *A Study of Population pressure and Land use in nanded District* या विषयावर 2002 मध्ये स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड अंतर्गत पीएच. डी केली आहे.

संभाव्य प्रकरण योजना (PLANNING OF THE RESEARCH WORK):-

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रकरण एक मध्ये कृषी भुगोल व्याख्या व स्वरुप, कृषी भूगोलाचा विकास, संशोधन साहित्याचा आढावा, संशोधन क्षेत्र, विषयाची निवड, संशोधनाचा उदेश, संशोधन पध्दती, अभ्यासाची मर्यादा व अभ्यासाचे महत्व यांचा समावेश असेल.

प्रकरण दोन :- संशोधन क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी

प्रकरण दोन अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक परिस्थितीशी संबंधित आहे. यामध्ये बीड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती, अभ्यास क्षेत्राचे भौगोलिक स्थान, सीमा व विस्तार, ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राकृतिक रचना, मदा, जलप्रणाली, नैसर्गिक वनस्पती व हवामान यांचा समावेश असेल.

प्रकरण तीन :- लोकसंख्या संसाधन

प्रकरण तीन मध्ये अभ्यासक्षेत्रातील लोकसंख्या, लोकसंख्येची वैशिष्टये, लोकसंख्या वितरण, लोकसंख्येची घनता साक्षरता व व्यावसायिक रचना यांचा समावेश असेल.

प्रकरण चार :- कृषी विषयक पायाभूत सुविधा

प्रकरण चार मध्ये अभ्यास क्षेत्रातील कृषी विषयक पायाभूत सुविधा व कृषी विषयक समस्या यांचा समावेश असेल

प्रकरण पाच :- पीक उत्पादन

प्रकरण पाच मध्ये अभ्यास क्षेत्रातील कृषी, कृषी विकास, प्रमुख पिके व पीक उत्पादन यांचा समावेश असेल.

प्रकरण सहा :- कृषी भूमी वापर

प्रकरण सहा मध्ये संशोधन क्षेत्रातील पीक प्रारुप व माजलगाव आणि शिरुर (का) तालुक्यातील कृषी भूमी वापराचा तुलनात्मक अभ्यास केला जाईल.

प्रकरण सात :- निष्कर्ष आणि उपाययोजना

प्रकरण सात मध्ये निष्कर्ष आणि त्यावर उपाययोजना यांचा समावेश असेल

संदर्भ सूची (References) :-

- Census of India 2001-2011 Maharashtra District Census hand book, Beed
- Dr. suryawansi M.V. (2009) Changing Pattern of Agricultural Land use in raigad district.
- डॉ. कनसे एस. एच. (2015) बीड जिल्हयातील नगदीपिकांचा भौगोलिक अभ्यास.
- डॉ. लांडगे एस.एस (2014) माजलगाव तालूक्यातील कृषी उत्पादनाचे भौगोलिक विश्लेषण.
- Dr.Phoke (2008) A Study of Agricultural Land use in Akola District a geographical Study.
- डॉ. गायकवाड जे.आर (2013) बीड तालूक्यातील कृषी उत्पादनाचा अभ्यास.
- डॉ सोनवणे श्री.के (2011) शिरूर का तालूक्यातील कृषी उत्पादन क्षमतेचे भौगोलिक सवैक्षण.
- Dr. Kore N.S (2002) A Study of Population pressure and Land use in nanded District.
- डॉ. विजया सोळुंके कृषी भुगोल डायमंड पब्लिकेशन.
- डॉ. अरुण राजाराम कुंभारी कृषी भूगोल डायमंड पब्लिकेशन.

Internet Sources :-

- Krishi.Maharashtra.Gov.in
- www.beed.nic.in